सन २०१७-१८ अर्थसंकल्पीय अनुदान मागणी
क्र. जे-५, ७६१०, शासकीय कर्मचारी इत्यादींना
कर्जे - मोटार वाहन खरेदी अग्रिमे..

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांक. मोसाअ १३१७/(२)/प्र.क्र. २३/का-पाच,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख : २९ सप्टेंबर २०१७

संदर्भ- १) शासन निर्णय वित्त विभाग क्र. अग्रिम २०१०/प्र. क्र. ३४/१०, विनियम, दि. ३० सप्टेम्बर २०१०
२) शासन निर्णय विधि व न्याय विभाग क्र. मोसाअ २०११/प्र. क्र. २४/११, का.५ दि. ७ जानेवारी २०१३
३) शासन निर्णय वित्त विभाग क्र. अग्रिम २०१३/प्र. क्र. १०/२०१३, विनियम, दि. २० ऑगस्ट २०१४
४) शासन ज्ञापन विधि व न्याय विभाग क्र. लेखानु-१८१७/दत्तमत/(प्र.क्र.५०)/का.२३, दि. ०३ एप्रिल २०१७
५) शासन ज्ञापन विधि व न्याय विभाग क्र. अनुदा-२२१७/(प्र.क्र.५६/१७)/का.२३,दि. २१ एप्रिल २०१७

शासन निर्णय :-

मागणी क्र. जे-५, मुख्यलेखाशीर्ष ७६१०, शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे, याखालील उपशीर्ष (२०२)(००)(०१) मोटार वाहन खरेदी अग्रिमे (७६१० ०४८१) यासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मंजूर अनुदानातून सोबत जोडलेल्या विवरणपत्र “ब” मधील स्तंभ २ येथील नमूद अधिकारी/कर्मचारी यांना मोटार वाहन खरेदी करण्यासाठी, स्तंभ ४ येथील नमूद नियंत्रक/मंजुरी अधिकारी यांना विवरणपत्र “अ” मधील स्तंभ ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे रु. २७,५९,०९१ /- (रु. सत्तावीस लाख एकोणसाठ हजार ऐक्याण्णव फक्त) इतका निधी खालील नमूद अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रमाणित करण्यास शासनाची मंजुरी देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

१) हा निधी, सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार, मुंबई वित्तिय नियम, १९५९ मधील नियम १३६,१३७ व १३९ च्या अधिन राहून तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अग्रिम-२०१३/प्र.क्र. १०/२०१३/विनियम, दि. २०.०८.२०१४ मधील सूचना व विहित नियम/अटींच्या अधीन राहून तसेच सदर शासन निर्णयातील तरतुदीचे काटेकोरपणे पालन करून वितरित करण्याची दक्षता मंजुरी/नियंत्रक अधिकारी यांनी घ्यावी.

२) सर्व मंजुरी/नियंत्रक अधिकारी यांनी उपलेखाशीर्षनिहाय मासिक खर्चाचे नियोजन करुन अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे (BDS) तरतुदीचे वाटप आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना करावे. सदर अनुदानातून केला जाणारा खर्च मासिक निधी विवरणपत्रानुसार संगणकीय अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे (BDS) त्या त्या महिन्याचा खर्च त्याच महिन्यांमध्ये करण्यात यावा व तो मंजूर तरतुदींच्या मर्यादेत करण्यात यावा.

३) अर्जदार खरेदी करणार असलेल्या मोटार वाहनाची किंमत प्रमाणित अग्रिमापेक्षा कमी असल्यास शिल्लक रक्कम तात्काळ शासनास परत करावा व तसे शासनास अवगत करण्यात यावे.

४) अर्जदारास त्याच्या नांवासमोर दर्शविलेल्या रकमेइतकेच अग्रिम मंजूर करावे. निर्देशिलेल्या अर्जदाराव्यतिरिक्त दुस-या कोणत्याही अर्जदारास हे अग्रिम देय होणार नाही.

५) संबंधित अधिकारी/कर्मचारी एखाद्या मंजुरी/नियंत्रक अधिकाऱ्यांच्या कार्यालयातून बदलून दुसरीकडे गेले असल्यास, अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर Authorisation Slip काढण्यापूर्वी, त्याबाबतचा तपशील शासनास कळविण्यात यावा. तदनंतर त्या अनुषंगाने, प्रणालीवर प्राधिकृत करण्यात आलेल्या रकमेमध्ये शासनाकडून आवश्यक ते बदल करण्यात आल्यानंतरच देयक तयार करण्याबाबतची पुढील कार्यवाही संबंधित कार्यालयाने करावी.

६) मोटार वाहन अग्रिम अधिकारी/कर्मचा-यास त्यांच्या सेवा कालावधीत एकदाच देय राहील.

७) प्रमाणित केलेल्या रकमेचा विनियोग विहित कालावधीत न झाल्यास प्रमाणित केलेली रक्कम त्वरीत शासनास प्रत्यार्पित करण्यात यावी. तसेच काही कारणास्तव सदर अग्रिम मंजूर करण्यात येत नसेल अथवा नाकारण्यात येत असेल तर तसे या विभागास शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून १० दिवसाच्या आत कळविण्यात यावे. अन्यथा याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबधित मंजूरी/नियंत्रक अधिकारी यांची राहील.

८) प्रत्येक कार्यालयाने उद्दीष्ट निहाय केलेला दर महिन्याचा प्रत्यक्ष खर्च हा महालेखापाल यांच्या लेख्यामध्ये दर्शविण्यात आलेल्या खर्चाशी तंतोतंत जुळण्यासाठी http://agmaha.cag.gov.in या वेबसाईटवर दरमहा मासिक खर्चमेळाचे काम ऑनलाईन करण्यात यावे व पडताळणी केलेल्या खर्चाचे मासिक विवरणपत्र रिकंसिलीएशन कंप्लिशन स्लिपसह प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत या विभागाच्या कार्यासन ५/२४ कडे परस्पर पाठविण्यात यावे.

९) नविन मोटार सायकल अग्रिम वसूली ६० समान मासिक हप्त्यांमध्ये व्याजासह, स्कूटर अग्रिम वसूली ४८ समान मासिक हप्त्यांमध्ये व्याजासह तसेच मोपेड अग्रिम वसूली ३० समान हप्त्यांमध्ये व्याजासह वसूल करण्यात यावी. तसेच नविन मोटार कार खरेदी करण्यासाठी मंजूर करण्यात येणा-या अग्रिमाची वसूली करताना प्रथमत: मुद्दलाची १०० समान मासिक हप्त्यात वसूली करावी व त्यानंतर व्याजाची वसूली ६० हप्त्यात करावी. मात्र, एखादा अधिकारी नियत वयोमानानुसार उपरोक्त मासिक हप्त्याचे प्रकरणपरत्वे १६०/६०/४८/३० महिने पूर्ण होण्यापूर्वीच सेवानिवृत्त होणार असेल तर त्याच्या सेवानिवृत्तीपूर्वी संपूर्ण अग्रिमाची व्याजासह वसूली होईल, अशा प्रकारे वसूलीचे हप्ते निश्चित करण्यात यावेत.

१०) नविन मोटार वाहन, अपंग राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी स्वयंचलीत तीन चाकी सायकल, स्कूटर, मोपेडचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविण्यात यावा व तो सतत चालू राहील याची दक्षता घेण्यात यावी.

११) अग्रिमासाठी अर्ज करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांची शासनाच्या सेवेतील नियुक्ती संबंधित पदाच्या सेवाभरती नियमानुसार करण्यात झाली असावी आणि नियुक्तीनंतर कमीत कमी पाच वर्षाची सलग सेवा झाली असावी.

१२) अग्रिम मंजूर केलेल्या कार्यालयीन आदेशाच्या प्रतीसह अर्जदाराने अग्रिम त्याच कारणासाठी वापरल्याबाबतचे प्रमाणपत्र या विभागास ताबडतोब पाठविण्यात यावे. तसेच खरेदीखत आणि गहाणखताच्या प्रती संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेकडून प्राप्त करुन घेऊन मंजूरी प्राधिका-यांनी आपल्या कार्यालयाच्या अभिलेखामध्ये जतन कराव्यात. संबंधित अर्जदारास अग्रीम मंजूरीच्या वेळी याबाबत आवश्यक सुचना देण्यात याव्यात. अन्यथा सदर प्रकरणी शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक अग्रीम-१०९५/प्र.क्र.७०/९५/विनियम, दिनांक २६ सप्टेंबर, १९९५ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

१३) ज्या अधिकारी/कर्मचारी यांना मंजूर करण्यात आलेल्या मोटार सायकल अग्रिमाबाबत त्यांच्या सेवापुस्तकात त्याप्रमाणे नोंद घेण्यात यावी. नोंद घेतलेल्या सेवापुस्तकाची पृष्ठाची छांयाकिंत प्रत शासनास सादर करावी.

१४) हा खर्च "मागणी क्र.जे-५ मुख्यलेखाशीर्ष ७६१०-शासकीय कर्मचारी इ.ना कर्जे, याखालील उपशीर्ष (२०२) (००) (०१) मोटार वाहने खरेदी अग्रीमे (संकेतांक ७६१० ०४८ १) -(योजनेतर/दत्तमत) यासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

१५) मोटार वाहने खरेदी अग्रिमाची वसुली ७६१०-शासकीय कर्मचा-यासाठी कर्जे इ., २०२-मोटार वाहनांच्या खरेदीसाठी आगाऊ रकमा (७६१० ५०२ ४) या जमाशीर्षाखाली जमा करावी व त्यावरील व्याज ००४९ व्याजाच्या जमा रकमा ८०० इतर जमा रकमा, (०१) (४५) (ii) मोटार वाहनांच्या खरेदीसाठी आगाऊ रकमा (००४९ १७४७) या जमाशीर्षाखाली जमा करावी.

१६) सदरहू ज्ञापन वित्त विभाग परिपत्रक क्र. अंदाज २०१३/प्र. क्र. ८५/२०१३/अर्थसंकल्प-३, दि. २५ एप्रिल २०१३ सोबतच्या परिशिष्टातील अट क्र. ८ मधील तरतूदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय निधी उपलब्धतेचे प्रमाणपत्र समजण्यात यावे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१७०९२९१६४५१६३६१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajesh Trimbak Sandansing

Digitally signed by Rajesh Trimbak Sandansing
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=50c9a0c21f38a819ad7296928f99514b4466f259bd59983f2b0b04a37a0f2890, cn=Rajesh Trimbak Sandansing
Date: 2017.09.29 16:37:45 +05'30'

(राजेश त्र्यं. सदांनसिंग)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सहपत्र:- विवरणपत्र “अ” व “ब”

प्रत,

१) महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई
२) सह सचिव, (प्रशा) विधि व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई
३) सह सचिव, विधि व न्याय विभाग, नागपूर
४) प्रबंधक़, (प्रशा), उच्च न्यायालय,खंडपीठ, औरंगाबाद
५) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१ मुंबई
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा) महाराष्ट्र २, नागपूर
७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
९) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नाशिक/ नंदुरबार/ जळगाव/अहमदनगर/औरंगाबाद/परभणी/ लातूर/बीड/नांदेड/वाशिम/बुलडाणा/अमरावती/वर्धा/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली
१०) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नाशिक/ नंदुरबार/ जळगाव/अहमदनगर/औरंगाबाद/परभणी/ लातूर/बीड/नांदेड/वाशिम/बुलडाणा/अमरावती/वर्धा/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली
११) वित्त विभाग, अर्थसंकल्प ७ व १० मंत्रालय, मुंबई.
१२) कार्यासन अधिकारी, कार्यासन -२३ व कार्यासन २४, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) निवडनस्ती /का.५, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.

विवरणपत्र "अ"				
शासन निर्णय, विधी व न्याय विभाग, क्र. मोसाअ १३१७/(२)/प्र.क्र.२३/का.पाच, दि. २९ सप्टेंबर २०१७ सोबतचे विवरणपत्र				
				आकडे (रुपयात)
१	**२**	**३**	**४**	**५**
अ. क्र.	DDO/ CO code	**मंजूरी अधिकारी**	**प्रयोजन**	**मंजूर करावयाचे अग्रीम (रुपये)**
१	**२**	**३**	**४**	**५**
१	J00६0	सह सचिव, विधि व न्याय विभाग, मुंबई अ.क्र. ०१	नवीन स्कुटर	६००००
२	J00१९	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नाशिक अ.क्र. २ ते ५	नवीन मोटार सायकल/ स्कुटर	२३०५५०
३	J00८३	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार अ.क्र. ६	नवीन मोटार कार	७०००००
४	J00२१	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगाव अ.क्र. ७	नवीन स्कुटर	४६४३०
५	J00२२	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर अ.क्र. ८ ते १०	नवीन स्कुटर	१८७९८०
६	J00१२	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, औरंगाबाद अ.क्र. ११ व १२	नवीन मोटार सायकल/ स्कुटर	१०७३३०
७	३१०१००४४३२	प्रबंधक (प्रशा) उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद अ.क्र. १३ व १४	नवीन मोटार सायकल/ स्कुटर	४०१४९०
८	J00१४	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, परभणी अ.क्र. १५	नवीन मोटार सायकल	५८९४०
९	J00१८	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, लातूर अ.क्र. १६	नवीन स्कुटर	५५१३०
१०	J00१५	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड अ.क्र. १७	नवीन स्कुटर	५८०३६
११	J00१६	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नांदेड अ.क्र. १८	नवीन स्कुटर	५३०१२
१२	J00८0	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम अ.क्र. १९	नवीन मोटार सायकल	५५०००
१३	J000९	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बुलडाणा अ.क्र.२० व २१	नवीन मोटार सायकल	१२१३३०
१४	J000८	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती अ.क्र.२२ ते २४	नवीन मोटार सायकल/ स्कुटर	१७०३३०
१५	J00३२	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वर्धा अ.क्र.२५ व २६	नवीन स्कुटर	१०४३७०
१६	J00३३	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर अ.क्र. २७	नवीन स्कुटर	५३९७३
१७	J00४९	सह सचिव, विधि व न्याय विभाग, नागपूर, अ.क्र. २८	नवीन स्कुटर	५३७००
१८	J00३४	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा अ.क्र. २९	नवीन स्कुटर	५१५५०
१९	J00३५	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, चंद्रपुर अ.क्र. ३० व ३१	नवीन मोटार सायकल/ स्कुटर	९०४४०
२०	J00३६	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली अ.क्र. ३२ व ३३	नवीन स्कुटर	९९५००
	एकूण - सत्तावीस लाख एकोणसाठ हजार ऐक्याण्णव फक्त			**२७५९०९१**

Rajesh Trimbak Sandansing

Digitally signed by Rajesh Trimbak Sandansing
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=50c9a0c21f38a819ad7296928f99514b4466f259bd59983f2b0b04a37a0f2890, cn=Rajesh Trimbak Sandansing
Date: 2017.09.29 16:37:55 +05'30'

(राजेश त्र्यं. संदानसिंग)

कक्ष अधिकारी , महाराष्ट्र शासन

विवरणपत्र "ब"						
शासन निर्णय, विधी व न्याय विभाग, क्र. मोसाअ १३१७/(२)/प्र.क्र. २३/का.पाच, दि. २९ सप्टेंबर २०१७ सोबतचे विवरणपत्र						
अ.क्र.	अर्जदाराचे नाव	पदनाम	मंजूरी अधिकारी	प्रयोजन	मंजूर करावयाचे अग्रीम(रुपये)	शेरा
१	श्री. अली उस्मान खान	शिपाई	सह सचिव व विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई	नविन स्कुटर	६००००	नियमानुसार
२	श्री. सोमनाथ महादू भालेराव	बेलिफ	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नाशिक	नवनि मोटार सायकल	७००००	नियमानुसार
३	श्री. लिलाधर पुंडलिक पाटील	बेलिफ	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नाशिक	नविन स्कुटर	४९८६०	नियमानुसार
४	श्री. संजय भास्कर जाधव	बेलिफ	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नाशिक	नविन स्कुटर	५१८३०	नियमानुसार
५	श्री. जगनाथ मुरलीधर फसाळे	वरिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नाशिक	नवनि मोटार सायकल	५८८६०	नियमानुसार
६	श्री. अभय सोपानराव वाघवसे	न्यायाधीश	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार	नविन मोटार कार	७०००००	नियमानुसार
७	श्री. नारायण नथु पाटील	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगाव	नविन स्कुटर	४६४३०	नियमानुसार
८	श्री. हानिफ अली सय्यद	मुख्य बेलिफ	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर	नवनि मोटार सायकल	७००००	नियमानुसार
९	श्री. कृष्णा बबनराव सोनसळे	शिपाई	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर	नविन स्कुटर	५८३९०	नियमानुसार
१०	श्री. संजय रंगनाथ सातपुते	बेलिफ	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर	नविन स्कुटर	५९५९०	नियमानुसार
११	श्रीमती सुरेखा गणेश पिंपळे	लघु लेखक (उच्च श्रेणी)	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, औरंगाबाद	नविन स्कुटर	५२४८०	नियमानुसार
१२	श्री. शंकर दशरथ चव्हाण	लघु लेखक (निम्न श्रेणी)	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, औरंगाबाद	नवनि मोटार सायकल	५४८५०	नियमानुसार
१३	श्री. दिनेश रामराव पवार	स्वीय सहायक	प्रबंधक (प्रशा) उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद	नवनि मोटार सायकल	३५००००	नियमानुसार
१४	श्री. उत्तम धनाजी नरवाडे	हवालदार	प्रबंधक (प्रशा) उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद	नविन स्कुटर	५१४९०	नियमानुसार
१५	श्री. सोमनाथ किसन तोरमडल	लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, परभणी	नवनि मोटार सायकल	५८९४०	नियमानुसार
१६	श्री. विष्णू सुर्यभान पाटील	लघु लेखक (निम्न श्रेणी)	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, लातूर	नविन स्कुटर	५५१३०	नियमानुसार
१७	श्री. रविंद्र अंकुश मस्के	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड	नविन स्कुटर	५८०३६	नियमानुसार
१८	श्री. सत्यनारायण राधुलाल अहीर	सहायक अधिक्षक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नांदेड	नविन स्कुटर	५३०१२	नियमानुसार

१९	श्री. शेख गफ्फार शेख हक्कानी	आदेशिका वाहक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम	नवनि मोटार सायकल	५५०००	नियमानुसार
२०	श्री . सुनिल गजानन पाठक	बेलिफ	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बुलडाणा	नवनि मोटार सायकल	७००००	नियमानुसार
२१	श्री. सोपान डोमाजी वाठ	सहायक अधिक्षक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बुलडाणा	नवनि मोटार सायकल	५१३३०	नियमानुसार
२२	श्री. प्रदीप रामकृष्ण राऊत	बेलिफ	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती	नवनि मोटार सायकल	७००००	नियमानुसार
२३	श्री. देवानंद देविदास वाहाणे	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती	नविन स्कुटर	४८६३०	नियमानुसार
२४	श्री. रामदयाल छोटेलालजी बरदेला	सफाईगार	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती	नविन स्कुटर	५१७००	नियमानुसार
२५	श्री. भोलेश्वर विनायकराव आजनकर	बेलिफ	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वर्धा	नविन स्कुटर	५२५१०	नियमानुसार
२६	श्री.अजय शामराव वाघमारे	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वर्धा	नविन स्कुटर	५१८६०	नियमानुसार
२७	श्री. मो. शब्बीर मो. बशीर शेख	वरिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर	नविन स्कुटर	५३९७३	नियमानुसार
२८	श्री. रा.वा.मेश्राम	शिपाई	सह सचिव व विधि व न्याय विभाग, मंत्रालय, नागपूर	नविन स्कुटर	५३७००	नियमानुसार
२९	श्री. जितेंद्र नामदेवराव चकोले	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा	नविन स्कुटर	५१५५०	नियमानुसार
३०	श्री. किशोर बी. मेहेर	बेलिफ	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, चंद्रपूर	नवनि मोटार सायकल	५०४९०	नियमानुसार
३१	श्री. प्रविण मनोहरराव भुसाटे	लघु लेखक (निम्न श्रेणी)	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, चंद्रपूर	नविन स्कुटर	३९९५०	नियमानुसार
३२	श्रीमती आरती रेणुदास रामटेके	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली	नविन स्कुटर	४८५००	नियमानुसार
३३	श्रीमती मिना नितेश मोडकवार	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली	नविन स्कुटर	५१०००	नियमानुसार
				एकूण - सत्तावीस लाख एकोणसाठ हजार ऐक्याण्णव फक्त	**२७५९०९१**	

Rajesh Trimbak Sandansing

Digitally signed by Rajesh Trimbak Sandansing
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=50c9a0c21f38a819ad7296928f99514b4466f259bd59983f2b0b04a37a0f2890, cn=Rajesh Trimbak Sandansing
Date: 2017.09.29 16:38:06 +05'30'

(राजेश त्र्यं. संदानसिंग)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन